SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

गुरुवार, दिनांक २८ ऑक्टोबर, २०२१

अधिसूचना

क्रमांक : १०३/२०२१ दिनांक : २८/१०/२०२१

विषय :- **नविन महाविद्यालयाचे प्रथम संलग्निकरणाबाबत..**

सर्व संबंधीतांचे माहीतीकरीता अधिसूचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने खाली दर्शविलेले नविन महाविद्यालय सुरु करण्यास शासन पत्रात नमुद केलेल्या अटींच्या अधिन राहुन कायम विना अनुदान तत्वावर परवानगी दिलेली आहे. त्याअनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समितीचा अहवाल दि. १३.१०.२०२१ च्या विद्या परिषदेने विषय क्र.९ अनव्ये मान्य केल्यानुसार स्तंभ क्र.२ मध्ये दर्शविलेल्या संस्थेच्या स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या नविन महाविद्यालयास स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या अभ्यासक्रमाकरीता स्तंभ क्र. ६ मध्ये दर्शविलेल्या कालावधीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा, २०१६ मधील कलम १०८ व ११० मध्ये दर्शविलेल्या तरतुदींचे अधिन राहुन प्रथम संलग्निकरण प्रदान करण्यात येत आहे.

महाविद्यालयात उपरोक्त अभ्यासक्रमास प्रवेश देतांना शासनाने व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने निर्धारित केलेल्या नियमांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक आहे. मान्य प्रवेशक्षमतेपेक्षा अतिरीक्त विद्यार्थांना प्रवेश देण्यात येऊ नये.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे नियम, विनियम, अध्यादेश, परिनियम, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा, २०१६ मधील तरतुदी महाविद्यालयास बंधनकारक राहतील.

नियमानुसार शिक्षकांची तसेच शिक्षकेत्तर कर्मचा-यांची पदे भरणे संस्थेला बंधनकारक आहे.

शासन निर्णय क्र. युजीसी २००३/(३३/०३)/१ विशी-४, दिनांक ०६ एप्रील, २००३ प्रमाणे संस्थेच्या शैक्षणिक शुल्काच्या सुत्रांचे नियमन करणे व शैक्षणिक संस्था विनियम प्राधिकारीणीकडून सर्व अभ्यासक्रमांच्या शुल्काचे प्रमाणिकरण करुन घेणे संस्थेस / महाविद्यालयास बंधनकारक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारण्यापूर्वी शैक्षणिक शुल्काच्या सुत्रांचे प्रमाणिकरण शैक्षणिक संस्था विनियम प्राधिकारीणीकडून मान्य करुन घ्यावे व त्यानुसारच शुल्काची आकारणी करावी.

तसेच,शासन निर्णयातील अटी व शर्तीचे, संस्थेने/महाविद्यालयाने पालन करावे व तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा, २०१६ मधील कलम १०८ नुसार त्वरीत हमीपत्र सादर करणे संस्थेवर बंधनकारक आहे.

तक्ता

अ.क्र.	संस्थेचे नांव व पत्ता	महाविद्यालयाचे नांव, ठिकाण व सांकेतिक क्रमांक	विद्याशाखा/ अभ्यासक्रम	प्रवेश क्षमता	संलग्निकरणाचा काल ावधी	शासन आदेश क्र. व दिनांक
१.	२.	३.	४.	५.	६.	७.
१.	जनता बहुऊद्देशिय प्रसारक मंडळ, कोंडाळा महाली, ता. जि. वाशिम.	स्व. कु. अर्चनाताई चव्हाण कला, वाणिज्य व श्री. मनोहरराव नाईक विज्ञान महाविद्यालय, कोंडाळा महाली, ता. जि. -वाशिम. **(७४५)**	**बी.ए.भाग १** **(** मानव विज्ञान विद्याशाखा) मराठी, हिंदी,इंग्रजी (वाङःमय) मराठी,इंग्रजी (आवश्यक)समाजशास्त्र. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र. इतिहास,भुगोल,मानसशास्त्र, गृहअर्थशास्त्र **बी. कॉम. भाग-१** (वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा) **(अभ्यासक्रमिकेनुसार)** **बी.एस्सी. भाग-१** (विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा) मराठी,इंग्रजी(आवश्यक), प्राणिशास्त्र, वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र गणित, संगणकशास्त्र. इलेक्ट्रानिक्स,सुक्ष्मजीवशास्त्र.	१२० १२० १२०	सत्र २०२१-२२ करिता	शासन आदेश क्र. एनजीसी २०२१/(१८५/२१) /मशि-४, दि.३१ ऑगस्ट २०२१

२.	स्वान शिक्षण व क्रीडा बहुऊद्देशिय संस्थां, कंकरवाडी, तां-रिसोड, जि.- वाशिम.	श्री. जनार्धन रामचंद्र काकडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कंकरवाडी, तां-रिसोड, जि.- वाशिम. **(७४६)**	**बी.ए.भाग १** (मानव विज्ञान विद्याशाखा) इंग्रजी, मराठी, इंग्रजी साहित्य, मराठी साहित्य, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र. **बी. कॉम. भाग-१** (वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा) **(अभ्यासक्रमिकेनुसार)** **बी.एस्सी. भाग १** (विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा.) इंग्रजी, मराठी, रसायनशास्त्र, सुक्ष्मजीवशास्त्र, प्राणिशास्त्र, वनस्पतीशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित, संगणकशास्त्र.	१२० १२० १२०	२०२१-२०२२ करीता.	शासन आदेश क्र. एनजीसी २०२१/(१८५/२१) /मशि-४, दि.३१ ऑगस्ट २०२१
३.	भारतीय ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था तोरणाळा-जोडगव्हाण, ता. जि.वाशिम.	श्री. तुकारामजी पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तोरणाळा-जोडगव्हाण, ता.जि.वाशिम. **(७४७)**	**बी.ए.भाग १** (मानव विज्ञान विद्याशाखा.) इंग्रजी, मराठी, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, मराठी साहित्य, इंग्रजी साहित्य, मानसशास्त्र. **बी.एस्सी. भाग १** (विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा.) इंग्रजी, मराठी, गणित,भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र,वनस्पतीशास्त्र प्राणिशास्त्र,सुक्ष्मजीवशास्त्र, संगणकशास्त्र,इलेक्ट्रॉनिक्स **बी. कॉम. भाग-१** (वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा) **(अभ्यासक्रमिकेनुसार)** (माध्यम- मराठी व इंग्रजी.)	१२० १२० १२०	२०२१-२०२२ करीता.	शासन आदेश क्र. एनजीसी २०२१/(१९४/२१) /मशि-४, दि.३१ ऑगस्ट २०२१

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****